CMYK

आरोग्य विशेष...
>>पान 2
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कारकीर्द आता कुबड्यांवर आहे
>>पान 3
आरक्षणाची लढाई ही मोर्चे काढून नव्हे तर विधानसभेत जाऊन जिंकावी लागेल : ॲड. प्रकाश आंबेडकर
>>पान 4
सुविचार
प्रयत्न करत रहा, यश नक्कीच मिळेल.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



संजय लीला भन्साळींनी सेटवर केला एवढा 'छळ', चित्रपट सोडणार होता रणबीर कपूर
आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 94 ■ मंगळवार, दि. 12 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## सत्तेची चावी महायुती की महाविकास आघाडीकडे?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : सत्तेची चावी महायुती की महाविकास आघाडीकडे जाणार याचा निर्णय १५८ मतदारसंघ करणार आहे. या १५८ मतदारसंघात भाजप विरुद्ध काँग्रेस, शिंदे यांची शिवसेना विरुद्ध ठाकरेंची शिवसेना आणि अजितदादांची राष्ट्रवादी विरुद्ध शरद पवारांची राष्ट्रवादी अशी थेट लढत होत आहे. त्यामुळे १५८ मतदारसंघाचा कौल भाजप सरस की काँग्रेस, खरी शिवसेना शिंदेंची की ठाकरेंची, ओरिजनल राष्ट्रवादी दादांची की साहेब याचा फैसला होणार आहे. या थेट लढतींमुळे फक्त राज्यातील सत्तेत कोण बसेल याचा निर्णयच होणार नाही, तर राज्यात भाजप सरस आहे की महाराष्ट्र काँग्रेसचे गड आहे, खरी शिवसेना शिंदेंची आहे की ठाकरेंची आणि ओरिजनल राष्ट्रवादी दादांची असणार की राष्ट्रवादी शरद पवारांची याचा निर्णयही होणार आहे. त्यामुळे या थेट लढती निवडणुकीच्या दृष्टीने राजकीय पक्षांसाठी महत्त्वाच्या आहेत आणि मतदारांसाठी लक्षवेधी ठरत आहे.**

२०१९ पर्यत महायुती आणि महाआघाडी मध्ये दोन दोन पक्ष होते. त्यामुळे प्रामुख्याने भाजप राष्ट्रवादी विरोधात तर काँग्रेस शिवसेना विरोधात निवडणूक लढवत होती. मात्र, २०१९ नंतरच्या बदललेल्या समीकरणात राज्यातील महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही प्रमुख अलायन्समध्ये तीन–तीन पक्ष झाले. दोन्ही बाजूचे दोन दोन पक्ष तर एक प्रमुख पक्ष फूटून तयार झालेले दोन गट असे आहेत. त्यामुळे २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत कधी नव्हे अशी थेट लढतीचे समीकरण निर्माण झाले आहे.

भाजप विरुद्ध काँग्रेस अशी थेट लढत विदर्भातील ३५, मराठवाड्यातील १०, पश्चिम महाराष्ट्रातील १२, मुंबईतील ८, उत्तर महाराष्ट्रातील ६ आणि कोकणातील ४ अशा मतदारसंघात आहे.

दुसरी थेट लढत दोन्ही शिवसेना मध्ये होत आहे. शिंदेंची शिवसेना ठाकरेंच्या सेनेसमोर तब्बल ४६ मतदारसंघात उभी ठाकली आहे.




विदर्भात ५ मतदारसंघात दोन्ही शिवसेना समोरासमोर आहेत. मराठवाड्यात १०, पश्चिम महाराष्ट्रात ८, मुंबईत १०, उत्तर महाराष्ट्रात ४ आणि कोकणात ९ मतदारसंघात दोन्ही शिवसेना समोरासमोर आहेत.

राज्यातील ३७ मतदारसंघात काका आणि पुतण्यांच्या राष्ट्रवादीत आपापसात संघर्ष होत आहे..

दोन्ही राष्ट्रवादी विदर्भात ३ मतदारसंघात, मराठवाड्यात ६ ठिकाणी, पश्चिम महाराष्ट्रात तब्बल २१ ठिकाणी दोन्ही राष्ट्रवादीचे संघर्ष होणार आहे.

मुंबईत १, उत्तर महाराष्ट्रात ३ आणि कोकणात ही ३ ठिकाणी काका पुतण्यांचे पक्ष समोरासमोर उभे ठाकले आहेत.

३८ मतदारसंघात भाजपसमोर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार

दरम्यान, ३८ मतदारसंघ असे आहे, जिथे भाजप उमेदवारांसमोर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार उभे आहेत. त्यामुळे या मतदारसंघातील मतदारांचा कौलही मत्त्वाचा ठरेल. शिवाय ३४ मतदारसंघात भाजपचे उमेदवार कधीकाळी मित्र पक्ष राहिलेल्या उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या उमेदवारांशी दोन हात करणार आहे.१९ मतदारसंघात शिंदेंच्या शिवसैनिक काँग्रेस समोर उभे आहेत. त्यामुळे हे मतदारसंघही राज्याच्या सत्तेचा निकाल निश्चित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. भाजप आणि काँग्रेस यांच्यातील सर्वाधिक थेट लढती विदर्भात आहे. दोन्ही शिवसेनेमधील सर्वाधिक थेट लढती मुंबई आणि कोकणात आहे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस मधील सर्वाधिक थेट लढती स्वाभाविकपणे पवारांचा प्राबल्य असलेल्या पश्चिम महाराष्ट्रात आहेत.

## खा.राहुल गांधी यांच्या दौऱ्यामुळे चिखलीत ड्रोन, पॅराशुट अवकाश उड्डाणांना बंदी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** लोकसभेचे विरोधी पक्ष नेते तथा खासदार राहुल गांधी यांचा दिनांक १२ नोव्हेंबर रोजी चिखली येथे प्रचारसभा दौरा नियोजित आहे. त्याअनुषंगाने चिखली शहर तसेच परिसरात ड्रोन, पॅराशुट इत्यादी अवकाश उड्डाणांना मनाई असल्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जारी केले आहेत.



अति महत्त्वाच्या व्यक्तींच्या दौऱ्यानिमित्त सुरक्षिततेकरीता आणि कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहण्यासाठी हे आदेश जारी करण्यात आले आहेत.

या आदेशाचे उल्लघंन केल्यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम २२३ नुसार दंडनिय/कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## काँग्रेस उमेदवाराच्या मांसाहार पार्टीत एकाचा मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी:** वरोरा मतदार संघात काँग्रेस उमेदवार प्रवीण काकडे यांच्या प्रचारार्थ आयोजित मांसाहार पार्टीत दोन मद्यधुंद कार्यकर्ते विहिरीत पडले. त्यातील एकाचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे.

विधानसभा निवडणूक प्रचाराची रणधुमाळी सुरू असताना उमेदवार मतदारांना मांसाहारी व शाकाहारी पार्टी, दारू पार्टीचे प्रलोभन देत आहेत. ग्रामीण व शहरी भागात अशा पार्टी दररोज आयोजित केल्या जात आहेत. जेवणावळीची धूमधाम सुरू असताना कार्यकर्ते दारूच्या नशेत झिंगून पडत असल्याची घटना समोर आली आहे. वरोरा मतदार संघात निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदारांना आकर्षित करण्यासाठी काँग्रेस उमेदवार प्रवीण काकडे यांच्यासाठी त्यांचे समर्थक प्रमोद मगरे यांनी रविवारी मटण–चिकन पार्टीचे आयोजन केले होते. फतेहपूरच्या गिट्टी क्रशर कॉम्प्लेक्समध्ये मटण पार्टीचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये दारूचीही व्यवस्था करण्यात आली होती. पार्टीदरम्यान मद्यधुंद अवस्थेत असलेल्या दोन कार्यकर्त्यांचा तोल गेला आणि ते जवळच्या विहिरीत पडले.

अरुण महाले या एका कामगाराची वेळीच सुखरूप सुटका करण्यात आली, मात्र दुसरा कामगार गजानन काळे अद्याप बेपत्ता आहे. घटनेची माहिती मिळाल्यापासून मदत आणि बचावकार्य सुरू आहे, मात्र रात्रीचा अंधार असल्याने त्यांना विहिरीतून बाहेर काढता आले नाही. परिणामी त्याचा मृत्यू झाला. या घटनेने खळबळ उडाली असून प्रचाराला गालबोट लागले आहे.

## राज ठाकरे म्हणाले मी त्यांची सगळी अंडीपिल्ली बाहेर काढू शकतो, सदा सरवणकरांचं प्रत्युत्तर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :माहीम विधानसभा मतदारसंघात अमित ठाकरे यांच्याविरोधात शड्डू ठोकणारे शिंदे गटाचे विद्यमान आमदार सदा सरवणकर यांच्यावर सध्या मनसेच्या नेत्यांकडून चौफेर टीका सुरु आहे. राज ठाकरे यांनी स्वत:ही सदा सरवणकर यांच्यावर अप्रत्यक्षपणे टीकास्त्र सोडले होते. या सगळ्यावर आता सदा सरवणकर यांनी भाष्य केले आहे. निवडणुकीत प्रतिस्पर्ध्यांवर टीका होत असते. राज ठाकरे माझ्याबाबत बोलले असतील. मी त्यांना आदरपूर्वकच बघतो, अशी काहीशी मवाळ भूमिका सदा सरवणकर यांनी घेतली. ते सोमवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.



यावेळी सदा सरवणकर यांनी राज ठाकरे यांना अमित ठाकरे यांच्यावर टीका करणे टाळले. त्यांनी म्हटले की, मी बाळासाहेब ठाकरे यांचे विचार बाजूला ठेवून कुठलीही आंदोलनं केली नाहीत. त्यावेळी मला बाजूला ठेवून घरगडी उभा केला जायचा. त्यावेळी अन्याय होत होता, ही भावना होती. अन्यायाला वाचा फोडली. संदीप देशपांडे यांनी मी उमेदवारी मागे घेतली नाही, यावरुन टीका केली. पण ते माझे मित्र आहेत. आपण चॅनेलवर होता काय प्रेशर होतं हे तुम्ही पाहिलं आहे. माझी काय अंड्डीपिल्ली आहेत, ते सांगतील मी काय सांगू?, असे सदा सरवणकर यांनी म्हटले.

भाजपचे कोणतेही नेते इथे आता माझासोबत कोणी नाही. प्रत्येक पक्षाचे धोरण वेगळे असते. पण भाजपचे पदाधिकारी माझासाठी आजही फिरत आहेत, असे सदा सरवणकर यांनी सांगितले. मोदींच्या सभेवर महेश सावंत यांनी बोलणे म्हणजे तो विचारवंत आहे, त्यावर काय बोलायचं? राज ठाकरेंनी पर्सनली माझ्याशी संवाद साधलेला नाही, हे खरयं. मी समाधानला पाठवलं होतं ते म्हणाले, जे योग्य वाटतयं ते करा, मला भेटायचं नाही, असे सदा सरवणकर यांनी सांगितले.

यावेळी सदा सरवणकर यांनी भाजपच्या 'एक है तो सेफ है' घोषणेवर प्रतिक्रिया दिली. मला भाजपच्या जाहिरातीबाबत माहिती नाही, पण माहीम मतदारसंघातील मुस्लिम माझ्यासोबत आहेत, असे सदा सरवणकर यांनी म्हटले.

## भारताविरुद्ध विजय मिळवताना आफ्रिकेची दमछाक, मालिकेत गाठली बरोबरी

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताविरुद्धच्या दुसऱ्या टी–२० सामन्यात दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेची चांगलीच दमछाक झाली. भारताने विजयासाठी छोटेसे आव्हान दिले होते. मात्र तेही पूर्ण करता करता आफ्रिकेच्या नाकीनऊ आले.भारताने या सामन्यात पहिल्यांदा फलंदाजी करताना ६ बाद १२४ धावा केल्या होत्या. त्यानंतर आफ्रिकेला विजयासाठी १२५ धावा हव्या होत्या. अखेरीस शेवट्च्या फळीतील फलंदाजांनी जबरदस्त कामगिरी करत आफ्रिकेला हा विजय मिळवून दिला आणि बरोबरी गाठून दिली.चार सामन्यांच्या मालिकेत आता भारत आणि दक्षिण आफ्रिका १–१ अशा बरोबरीत पोहोचले आहेत. आफ्रिकेकडून ट्रिस्टन स्टर्ब्सने सर्वाधिक नाबाद ४७ धावांची खेळी करत संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले.

## संजय राऊत बरळले, व्यापारी–दुकानदार वर्गावर आक्षेपार्ह टीका

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत हे पुन्हा एकदा अडचणीत येण्याची शक्यता आहे. संजय राऊत यांनी व्यापारी आणि दुकानदारांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर टीका करताना संजय राऊत यांनी हे वक्तव्य केले आहे. संजय राऊत यांनी व्यापारी आणि दुकानदार वर्गाचा अपमान केला असून त्यांनी तात्काळी माफी मागावी अशी मागणी भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी केली आहे.



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर टीकास्त्र सोडले होते. त्यानंतर ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी टीका करताना व्यापारी आणि दुकानदार वर्गाबाबत बदनामीकारक वक्तव्य केले आहे. राऊतांच्या वक्तव्याचा फटका शिवसेना ठाकरे गटासह महाविकास आघाडीला बसण्याची शक्यता आहे. व्यापारी आपल्या फायद्यासाठी खोटं बोलतो. दुकानदार आपल्या फायद्यासाठी भेसळ करतो असे वक्तव्य संजय राऊतांनी केले.

संजय राऊत यांनी काय म्हटले होते?

अमित शाह खोटं बोलत आहेत. व्यापारी नेहमी खोटं बोलतो, दुकानदार हा आपल्या फायद्यासाठी खोटं बोलतो अथवा भेसळ करतो. ग्राहकाला फसवतो. कलम ३७० हटवण्याच्या निर्णयाला शिवसेनेने कधीही विरोध केला नाही. अमित शहा हे खोटं बोलत असल्याचे राऊत यांनी सांगितले.

राऊत यांनी पुढे म्हटले की, कलम ३७० हटवण्यात स्वत:ची पाठ थोपटून घेऊ शकतात. 'मैंने हटाया मैंने हटाया' असे म्हणता, मग स्वातंर्त्यवीर सावरकरांना भारतरत्न द्यायला तुम्हाला कोणी अडवलं आहे असा सवाल ही त्यांनी केला. आजही कश्मीर मध्ये आपल्या जवानांच्या हत्या सुरू असल्याचे सांगत कलम ३७० हटवून कश्मीरमध्ये आपण काय दिवे लावले आहेत, असा बोचरा वारही राऊतांनी केला.

भाजपची जळजळीत टीका

भाजपचे प्रवक्ते प्रविण दरेकर यांनी संजय राऊतांवर जळजळीत टीका केली. संजय राऊतांनी शिवसेनेचे व्यापारीकरण केले आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या वेळची शिवसेना आणि आताची शिवसेना यात फरक आहे. व्यापारी आणि दुकानदार या देशाचे नागरीक आहेत. संजय राऊतांच्या वक्तव्याने संपूर्ण व्यापारी–दुकानदार वर्गाचा अपमान झाला आहे. दुकानदारांनी आता पुड्या बांधता–बांधता राऊतांचा समाचार घ्यावा आणि महायुतीच्या बाजूने उतरावे असे आवाहन त्यांनी केले.




## काँग्रेसकडून २२ मतदारसंघांतील २८ बंडखोरांचे निलंबन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** काँग्रेसने पक्षविरोधी कारवाया करणाऱ्या राज्यातील २२ मतदारसंघांतील २८ बंडखोरांविरोधात निलंबनाची कारवाई केलीय. काँग्रेसने पहिल्या यादीत १६ मतदारसंघांतील २१ उमेदवारांविरोधात निलंबनाची कारवाई केली होती. त्यानंतर दुसऱ्या यादीत ६ मतदारसंघांतील ७ बंडखोरांचा समावेश आहे. पुढील सहा वर्षांसाठी या बंडखोरांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आलीय. काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या आदेशानुसार आणि प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या निर्देशानुसार बंडखोरांविरोधात ही कारवाई करण्यात आल्याची माहिती काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष नाना गावंडे यांनी दिलीय. महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांनी महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांविरोधात बंडखोरी केल्याने पक्षाने हे निलंबनाचे पाऊल उचललंय.

पक्षादेश डावलून अधिकृत उमेदवारांविरोधात बंडखोरी करणाऱ्या नेत्यांमुळे काँग्रेसची कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी राज्यात कुठल्याही मतदारसंघात मैत्रीपूर्ण लढत होणार नाही, असा स्पष्ट निर्वाळा दिलाय. राज्यातील कोणत्याही बंडखोराला पाठीशी घातले जाणार नाही, सर्व बंडखोरांविरोधात निलंबनाची कारवाई होईल, असे त्यांनी यापूर्वीच स्पष्ट केले होते. पुण्यातील कसबा पेठ मतदारसंघात काँग्रेसच्या माजी महापौर कमल व्यवहारे यांनी बंडखोरी केलीय. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उभे असलेल्या कोपरी–पाचपाखाडी मतदारसंघात शिवसेना उबाठातर्फे केदार दिघे यांना उमेदवारी देण्यात आलीय.

मात्र त्यांच्या विरोधात काँग्रेसचे माजी नगरसेवक मनोज शिंदे यांनी अपक्ष अर्ज कायम ठेवलाय. त्यामुळे मविआचे अधिकृत उमेदवार केदार दिघे यांना अडथळा निर्माण झालाय. एकीकडे बंडखोरांविरोधात कारवाईचे पाऊल उचलले जात असताना बंडखोर उमेदवाराचा निवडणुकीत विजय झाल्यास मात्र त्याला पक्षात सामावून घेतले जात असल्याने निलंबनाची ही कारवाई किती गंभीरपणे केली जाते, याकडे साशंकतेने पाहिले जाते.



सांगलीत जयश्री पाटलांची बंडखोरी : सांगली लोकसभा मतदारसंघात विशाल पाटील यांनी बंडखोरी केली होती, मात्र ते विजयी झाल्यानंतर काँग्रेसने त्यांना सहयोगी सदस्य म्हणून सामावून घेतले. आता ही सांगलीत जयश्री पाटलांनी बंडखोरी केलीय. काँग्रेसचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज पाटील यांच्याविरोधात त्या रिंगणात आहेत आणि खासदार विशाल पाटलांनी त्यांना पाठिंबा दिला. त्यामुळे यावेळी देखील सांगली पॅटर्न चालतो का हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

कुणाचे झाले निलंबन : आरमोरी – आनंदराव गेडाम आणि शीलू चिमुरकर, गडचिरोली –सोनल कोवे आणि भरत येरमे, बल्लारपूर – अभिलाषा गावतुरे आणि राजू झोडे, भंडारा – प्रेम सागर गणवीर, अर्जुनी मोरगाव – अजय लांजेवार, भिवंडी– विलास रघुनाथ पाटील व आसमा चिखलेकर, मीरा–भाईंदर– हंस कुमार पांडे, कसबा पेठ – कमल व्यवहारे, पलूस कडेगाव–मोहनराव दांडेकर, अहमदनगर शहर–मंगला विलास भुजबळ, कोपरी पाचपाखाडी – मनोज शिंदे आणि सुरेश पाटील–खेडे, उमरखेड –विजय खडसे, यवतमाळ –शब्बीर खान, राजापूर– अविनाश लाड, काटोल याज्ञवल्क्य जिजकार, रामटेक– राजेंद्र मुळूक, सिंदखेडा –शामकांत सनेर , श्रीवर्धन –राजेंद्र ठाकूर, पर्वती– आबा बागुल, शिवाजीनगर –मनीष आनंद, परतूर –सुरेश कुमार जेथलिया आणि कल्याण बोराडे, रामटेक– चंद्रपाल चौकसे

CMYK

## पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पक्षीतज्ञ डॉ सलीम अली यांचा आज जन्मदिन आहे. पक्षीतज्ज्ञ डॉ सलीम अली यांचा जन्म आजच्याच दिवशी म्हणजे १२ नोव्हेंबर १८९६ रोजी मुंबईत एका गरीब मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे पूर्ण नाव सलीम मोईनुद्दीन अब्दुल अली असे होते. सलीम अली हे एक वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे तर दोन वर्षाचे असताना आईचे निधन झाले. अगदी बालवयातच आई वडिलांचे छत्र हरपलेल्या सलीम अलींचा सांभाळ त्यांच्या मामांनी केला. सलीम अली यांना लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड होती. वयाच्या नवव्या वर्षी त्यांनी गळ्यावर पिवळा डाग असलेली चिमणी विकत घेतली होती. हा पक्षी कोणता आहे ? त्याचे नाव काय आहे ? हे त्यांना माहीत नव्हते म्हणून ते माहीत करून घेण्यासाठी ते त्या चिमणीला घेऊन मामांकडे गेले मामांनी सरळ त्याला बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या संचालकाकडे घेऊन गेले. तिथे संचालकांनी सलीम अलींना त्या पक्षाची सविस्तर माहिती सांगितली तसेच संस्थेतील भुसा भरलेल्या पक्षांचा संग्रह दाखवला. तो क्षण डॉ सलीम अलींच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. त्या क्षणी त्यांच्यावर पक्षांची जी भुरळ पडली ती कायमचीच. त्यानंतर त्यांना पक्षी निरीक्षणाचा छंदच जडला. १९१३ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर डॉ सलीम अली यांनी सेंट झेव्हीयर महाविद्यालयात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला. लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड असल्याने सलीम अली यांनी उच्च शिक्षणासाठी प्राणी विज्ञान हा विषय निवडला. या विषयात त्यांना बी ए ऑनर्स ही पदवी मिळवली मात्र ही पदवी विद्यापीठाच्या समकक्ष समजली जात नव्हती त्यामुळे त्यांना भारतीय प्राणी वैज्ञानिक सर्व्हेक्षण संस्थेत नोकरी मिळू शकली नाही मात्र बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीत त्यांना व्याख्यता म्हणून नोकरी मिळाली. त्यानंतर ते जर्मनीची राजधानी बर्लिनला गेले तेथे जाऊन त्यांनी पक्षी शास्त्रावर प्रशिक्षण घेतले तिथे त्यांना जगप्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ एर्व्हिन ष्ट्रेझमन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यानंतर काही काळ इंग्लंडमध्येही काम केले. १९३१ साली ते भारतात परत आले. परत आल्यावर त्यांनी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे उपकार्यवाहक पद स्वीकारले. नंतर ते या संस्थेचे अध्यक्षही बनले. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी हैदराबाद पक्षी निरीक्षण, त्रावणकोर – कोचीन पक्षी सर्व्हेक्षण, अफगाणिस्तान पक्षी सर्व्हेक्षण, कैलास पक्षी निरीक्षण यात्रा अशा मोहिमा राबवल्या. डॉ सलीम अली यांनी सुगरण पक्षाच्या वर्तनावर बारकाईने अभ्यास केला व त्यावर बिएनएचएस जर्नलमध्ये एक शोधनिबंध लिहिला. या शोध निबंधाने त्यांना पक्षी शास्त्रज्ञ म्हणून मान्यता मिळवून दिली. डॉ सलीम अली यांनी भारतभर फिरून विविध पक्षांची तपशीलवार माहिती गोळा केली. ती माहिती त्यांनी सर्वसामान्य नागरिकांना समजावी यासाठी पुस्तक रुपात लिहिली. त्यांनी लिहिलेल्या हँडबुक ऑफ इंडिया अँड पाकिस्तान व पिक्टोरियल गाईड या दहा खंडीय पुस्तकाने त्यांचे जगभर नाव झाले. डॉ डीलन रीलपे यांच्या साथीत त्यांनी अपार मेहनत घेऊन भारतीय पक्षांच्या बाराशे जाती, २१०० उपजातींच्या नोंदी, सवयी, शास्त्रशुद्ध सर्वांगीण माहिती चित्रांसाहित एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिली. डॉ सलीम अली यांच्या ह्याच कार्याने भारतात हौशी पक्षी निरीक्षक बनण्याची परंपरा निर्माण झाली. भारतातील पक्षी निरीक्षक डॉ सलीम अली यन्स आद्य गुरू मानतात. त्यांच्या कार्याची नोंद घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला तसेच त्यांचा जन्मदिन पक्षीदिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. डॉ सलीम अली यांचे २७ जुलै १९८७ रोजी निधन झाले. डॉ सलीम अली यांना जन्मदिनी विनम्र अभिवादन!

# घराघरात असणारी गुणकारी तुरटी !

लहानपणापासून दाढीच्या डब्ब्यात ठेवलेली किंवा पाणी स्वच्छ करणारी तुरटी आपण बघितली असेलच. दाढी करतांना ब्लेडने रक्त निघाल्यास पटकन तुरटी फिरविली की रक्त थांबते व जखम लवकर भरून आणते. गढूळ पाणी असेल तर तुरटी पाण्यात फिरविल्यास घाण, माती तळाला जाऊन बसते व स्वच्छ पाणी मिळते.



पाणी शुद्ध करण्याची ही पद्धत पूर्वापार आहेच. आयुर्वेदात स्फटीका नावाने आलेली ही तुरटी अनेक रोगांवर औषधी बाह्य आभ्यांतर प्रयोगार्थ वापरली जाते. कच्ची किंवा भस्म स्वरूपात फिटकरी वा तुरटीचा उपयोग करण्यात येतो.

तुरटी स्वच्छ करून तव्यावर गरम केल्यास त्यातील द्रव्यांश उडून जातो व खडूप्रमाणे पांढरे भस्म तयार होते. हे भस्म आभ्यंतर व बाह्य प्रयोगार्थ वापरण्यात येते.

तुरटी रक्तवाहिन्यांना संकुचित करते त्यामुळे रक्तस्राव थांबविण्यास मदत होते. या तुरटी भस्माचा डस्टिंग पावडरप्रमाणे कुठल्याही व्रण जखम इजा झाल्यास उपयोग करता येतो. व्रणरोपण (जखम बरी) होण्याकरीता तुरटी भस्म व तूप एकत्र करून पट्टी बांधावी. रक्त लगेच थांबते व घाव पूयनिर्माण न होता लवकर भरतात.

नेत्ररोगाकरीता तुरटी उत्तम उपाय आहे. डोळ्यात मळ चिकट स्राव निघत असेल, धूळ गेल्याने त्रास होत असेल तर तुरटी फिरविलेल्या पाण्याने डोळे स्वच्छ करावे.

हूपिंग कफ, लहान मुलांना होणाऱ्या खोकल्यावर इतर औषधी कल्पांसह तुरटीभस्माचा वापर करता येतो.

मुखपाक असल्यास जिभेला फोड येत असल्यास तुरटीच्या पाण्याने गुळण्या करणे लाभदायक आहे.

मंजनामधे तुरटी भस्माचा वापर करता येतो. हिरड्यातून रक्त येणे बंद होते.

तुरटी स्वस्त व लवकर उपलब्ध होणारी असल्याने घर

गुती औषधींमधील उत्तम पर्याय आहे.

# चेहऱ्यावरील वांग – आयुर्वेदविचार

अनेक स्त्रियांना, मुलींना किंवा बऱ्याच पुरुषांना देखील चेहर्यावर पडलेले काळे डाग भेडसावत असतात. गर्भारपणानंतर अनेक स्त्रियांना चेहर्यावर वांग दिसायला लागतात. अनेक क्रिम लोशन लावल्या नंतरदेखील हे डाग नष्ट होत नाहीत. घरगुती उपचार औषधी उपचार देखील प्रभावी ठरत नाही. आयुर्वेदात यालाच व्यंग रोग म्हणतात. वात पित्त रक्त दुष्टीची कारणे सहसा या व्याधीत आढळून येतात.



शिळे थंड पदार्थ खाणे.

आंबवलेले पदार्थ, बेकरी पदार्थांचा अति वापर.

गरम मसाले लोणची सतत खाणे. विदाह निर्माण करणारे उष्ण पदार्थाचे सतत सेवन.

भेळ पाणीपुरी पिझ्झा बर्गर याचे सेवन

व्यायाम न करणे किंवा अति व्यायाम परिश्रम करणे.

घाम न येऊ देणे. (सतत एसी मधे राहणे )

उन्हात सतत फिरणे अग्नि संपर्कात जास्त वेळ राहणे.

लघवी मल प्रवर्तनासारखे नैसर्गिक वेग थांबवून ठेवणे.

अति क्रोध शोक हे सुद्धा व्यंगाचे एक कारण आहे.

या सर्व रक्त दूषित होणाऱ्या कारणांमुळे हळूहळू त्वचेत बदल घडत जातात व व्यंग निर्माण होते.

यावर चिकित्सा म्हणजे कारणांचा शोध घेऊन त्याचे सेवन बंद करणे. तसेच विरेचन रक्तमोक्षण सारखे पंचकर्म करावे.

यामुळे शरीरातील रक्तातील वाढलेले दोष बाहेर काढल्या जातात.

काही रक्तदुष्टी कमी करणारी औषधे पोटातून देणे.

लेप चिकित्सा खूप प्रभावी कार्य करते. अनेक लेप प्रकार या करीता आयुर्वेदात आले आहेत.


मसूरपीठ मध तूप व दूधमिश्रीत करून लावणे.

शाल्मली कंटक दुधासह वाटून लावणे.

कुंकुमादी तेलाचे नस्य घेणे.

या बाह्य चिकित्सा चेहर्यावरील डाग कमी करण्यास लाभदायक ठरतात.


आहारातील पथ्यपालन मानसिक आरोग्याकरीता प्राणायाम लवकर बरे होण्याकरीता नक्कीच फायदा करतात.



## गुणकारी टरबुज

टरबुजची अत्यंत गुणकारी औषध म्हणून देखील या फळाची ओळख आहे. हृदयासाठी उपयुक्त ठरण्यासोबतच वियाग्राचे काही गुणसत्व देखील यामध्ये आहेत. शिवाय टरबुजाच्या बियांमध्ये देखील विविध गुणधर्म असल्याने शरिरासाठी अत्यंत उपयुक्त फळ म्हणून आयुर्वेदात या फळाचा उल्लेख आहे. वरतून काळा किंवा हिरवट रंग आणि आतुन लाल रंग असलेले टरबुज उन्हाळय़ाच्या दिवसांमधील एक महत्वपूर्ण फळ म्हणून ओळखले जाते. तापत्या उन्हामुळे शरिरातील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होते. टरबुजामध्ये अंतर्गत पाण्याचे प्रमाण अधिक असल्याने शरिरातील पाणी संतुलीत ठेवण्याचे काम टरबुज करते.मधुमेहाचा आजार असणार्या रुग्णांनाही टरबुज सेवण करता येते. शिवाय टरबुजामध्ये विटामिन ए, सी. आणि बी ६ हे जीवनसत्व आहेत. बीटा कैरोटीन नावाचे जीवनसत्व यामध्ये अधिक असल्याने हृदयाशी संबधीत आजार असलेल्यांसाठी टरबुज अधिक उपयुक्त ठरते.त्यामुळे टरबुज नुसतेच उन्हाची दाहकता कमी करणारे फळ नसुन गुणकारी औषध म्हणुन देखील शरिरासाठी अत्यंत उपयुक्त असल्याचा उल्लेख आयुर्वेदासह सध्याच्या वैद्यकीय शास्त्रातही आढळून येतो.

## प्रवाळ – आभूषण व औषधोपयोगी !



प्रवाळ किंवा पोवळे coral आपण अनेक वेळ बघितले असेल. रत्न म्हणून याचा वापर करण्यात येतो. ग्रहांचा खडा म्हणून पोवळ्याची अंगठी माळ घालण्यास सांगितली जाते. पोवळे दिसायला अतिशय सुंदर रत्न आहे. समुद्रात तळाशी सापडणारे हे प्रवाळ प्राण्याचे शव असते. कालांतराने ते कठीण व लाल होत जाते. समुद्रात बऱ्याच ठिकाणी पोवळ्याचे अगदी पहाड सुद्धा बनलेले असतात. प्रवाळात कॅल्शियम कार्बोनेट भरपूर प्रमाणात असते. प्रवाळ आभूषण किंवा ग्रहाचा खडा म्हणून वापरण्यात येत असला तरी हे प्रवाळ किंवा लीरश्र औषध म्हणूनही खूप उपयुक्त असते. अनेक औषधी कल्पात या प्रवाळाचा उपयोग केला जातो.

आयुर्वेदाची ही खूप मोठी विशेषता आहे. केवळ वनस्पती नाही तर प्राणीज द्रव्य औषध म्हणून कसे वापरायचे त्याचे गुण काय हे देखील वर्णित आहे. किती संपन्न शास्त्र आहे बघा आयुर्वेद. अजूनही प्रवाळ बेट प्रवाळ यावर संशोधन सुरु आहे आणि हजारो वर्षापूर्वी लिहिलेल्या आयुर्वेदात मात्र समुद्राच्या तळाशी सापडणारे हे प्राणीज द्रव्य, त्याचा उपयोग कसा करायचा कोणते प्रवाळ औषधी उपयोगार्थ वापरायचे, खरे प्रवाळ कसे ओळखायचे याबद्दल विस्तृत विवेचन मिळते. कसोटीच्या दगडावर घासल्यावरही ज्याचा रंग बदलत नाही ते श्रेष्ठ व ग्राह्य प्रवाळ मानले जाते.

प्रवाळाचे शुद्धीकरण केल्यानंतरच त्याचा औषधी स्वरूपात वापरता होतो. शास्त्रोक्त पद्धतीने प्रवाळ शोधन मारण करणे आवश्यक ठरते. प्रवाळभस्म, प्रवाळ पिष्टी, प्रवाळपंचामृत असे कल्प प्रवाळापासून बनविण्यात येतात. आजकाल प्रवाळ मिश्रित गुलकंद सुद्धा बाजारात मिळते.

प्रवाळ अम्लतानाशक, अम्लपित्त – रक्तार्श नाशक आहे. शरीरातील उष्णता कमी करणारे, रक्तविकार, दाहशमन करणारे आहे. यात प्राकृतिक कॅल्शियम जास्त असते. त्यामुळे हाडांना मजबूत करणारे आहे. अनेक त्रिदोष विकारांमधे या प्रवाळाचा युक्तीने वैद्यवर्ग वापर करत असतो. असे हे रत्न; आभूषण, औषध असे दोन्हीकरीता अतिशय उपयोगी आहे.

# आंबवलेले पदार्थ शरीरासाठी ठरतात लाभदायक, ७ फायदे गुणकारी

फर्मेंटेड फुड म्हणजेच आंबवलेले पदार्थ. इडली, डोसा हे पदार्थ तयार करताना सर्वात आधी त्याचे पीठ आंबवले जाते. आंबवलेले पदार्थ आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. आंबवण्याच्या प्रक्रियेत बॅक्टेरिया आणि यीस्टसारखे सूक्ष्म जीव स्टार्च आणि साखर सारख्या कर्बोदकांमधे अल्कोहोल किंवा ऍसिडमध्ये रूपांतरित करतात. त्यामुळं जास्त प्रमाणात आंबवलेल्या पदार्थांची चवदेखील थोडी आंबट होते. आंबवण्याच्या प्रक्रियेत चांगले जीवाणू वाढतात. या जीवाणूंना प्रोबायोटिक असं म्हणतात. आंबवलेल्या पदार्थाचे सात फायदे जाणून घ्या.



आंबवलेले पदार्थ कसे बनवले जातात?

आंबवलेले पदार्थ बनवण्यासाठी काही पदार्थांना काही तासांसाठी रुम टेम्परेचरवर ठेवून दिले जाते. म्हणजेच जर तुम्हाला इडली किंवा डोसा बनवायचा असेल तर डाळ–तांदुळ मिक्सरमध्ये वाटून त्याचे पीठ तयार करुन ते आंबवण्यासाठी ठेवावे. अशाच प्रकारे तुम्ही ढोकण्याचे पीठदेखील तयार करु शकता. काही तास हे पीठ रुम टेम्परेचरवर ठेवल्याने त्याची आंबण्याची प्रक्रिया सुरू व्हायला लागते. पीठ आंबल्याने त्याची चवदेखील बदलते. तर, पीठ आंबत असताना ते हळूहळू फुलायला लागते. पीठ लवकर आंबवायचे असल्यास बेकिंग सोडा, यीस्ट किंवा फ्रूट सॉल्ट टाकू शकतात.

आंबवलेल्या पदार्थांचे आरोग्यासाठी फायदे

१. प्रोबायोटिक

बहुतेक आंबवलेल्या पदार्थांमध्ये चांगले जीवाणून असतात. जे प्रोबायोटिक असतात. हे जीवाणू तुमच्या आतड्यातील बॅक्टेरियाचे संतुलन पुनर्संचयित करण्यास मदत करतात आणि पचनासंबंधीत सर्व समस्या दूर करतात.

२. पचनास मदत करतात

नैसर्गिक साखर आणि स्टार्चचे विघटन झाल्यामुळं आंबवलेले पदार्थ पचायला सोपे असतात.

३. जेव्हा आपण काही पदार्थ आंबवतो तेव्हा आपण त्यांची आरोग्य क्षमता वाढवण्यास मदत करत असतो. तुमच्या आतड्यातील बॅक्टिरीया वाढवून शरीराला बी जीवनसत्व आणि व्हिटॅमिन के तयार करण्यची क्षमता निर्माण करते.

४. मूड सुधारतो

आंबवलेल्या पदार्थांमध्ये डरलीं लरलळश्रश्रळी हशर्श्रीशींळर्ली रपव इळषळवेलरलींशीळर श्रेपर्सीा हे दोन गुणधर्म आढळतात. या मुळं मानसिक ताण–तणाव आणि डिप्रेशनसारख्या समस्येंवर मात करण्यास मदत करतात.

५. हृदयाचे आरोग्य सुधारते

आंबवलेले पदार्थ हे पौष्टिक आणि संतुलित आहार आहे. या आहारामुळे हृदयविकाराच्या झटका येण्याची शक्यता कमी होते. तसंच, कोलेस्ट्रॉल बॅलेन्स आणि रक्तदाब नियंत्रणात राहतो.

६. रोगप्रतिकार शक्ती वाढवते

आंबवलेल्या पदार्थांमुळं रोगप्रतिकार शक्ती वाढते. त्यामुळं सर्दी, खोकला यासारखे आजार कमी होतात. व्हिटॅमिन सी, आयर्न, झिंक इत्यादी गुणधर्म आढळतात.

७. वजन कमी करते

अनेक संधोशनानुसार, आंबवलेल्या पदार्थांमुळं वजन व पोटाचा घेर कमी होण्यास मदत होते.

## शरीरातील या समस्या आहेत फुफ्फुसाच्या संसर्गाची लक्षणे, अशी घ्या काळजी

आता देशात कोरोनाची व्याप्ती कमी होताना दिसत आहे. मात्र, यापूर्वी हजारो लोक पुन्हा या विषाणूच्या विळख्यात आले आहेत. या वेळी कोविडची लक्षणे पूर्वीप्रमाणेच सौम्य राहिली, परंतु गंभीर आजार असलेल्या रुग्णांना रुग्णालयात दाखल करावे लागले, परंतु रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर काही लोकांना श्वसनाचा त्रास होत आहे, ज्याचे कारण थेट फुफ्फुसाच्या कमकुवतपणामुळे आहे. डॉक्टरांचे म्हणणे आहे की, काही प्रकरणांमध्ये कोविडची सौम्य लक्षणे दिल्यानंतरही समस्यांना सामोरे जावे लागू शकते. यामध्ये श्वसनमार्गाशी संबंधित समस्या अधिक दिसून येतात. कोविडमधून बरे झाल्यानंतरही तुम्हाला श्वसनाचा त्रास होत असेल, तर तुम्ही डॉक्टरांशी संपर्क साधावा. हे फुफ्फुसातील संसर्गाचे लक्षण आहे. या बाबीकडे दुर्लक्ष केल्यास फुफ्फुसातील समस्या वाढू शकते.

पल्मोनोलॉजिस्ट डॉ भगवान मंत्री स्पष्ट करतात की कोविड नंतर श्वासोच्छवासाची समस्या दिसून येते. अशी समस्या उद्भवल्यास पल्मोनरी फंक्शन टेस्ट करता येते. या चाचणीच्या मदतीने, फुफ्फुसात किंवा श्वसनमार्गामध्ये कोणताही संसर्ग शोधला जाऊ शकतो. कोविड दरम्यान काही रुग्णांमध्ये न्यूमोनियाच्या तक्रारी देखील दिसून येतात, ज्याचा प्रभाव बरे होईपर्यंत टिकतो. अशा परिस्थितीत, आपल्या आरोग्याची काळजी घेणे महत्वाचे आहे. जर तुम्ही दमा, सीओपीडी किंवा ब्रॉंकायटिसचे रुग्ण असाल, तर फुफ्फुसांच्या आरोग्याची काळजी घेणे फार महत्वाचे आहे.

गेल्या दोन दिवसांपासून देशात कोविडचे रुग्ण कमी होत आहेत. गेल्या २४ तासांत ७ हजारांहून कमी केसेसची नोंद झाली आहे. तीन दिवसांपूर्वीपर्यंत १० हजारांहून अधिक केसेस येत होत्या, या दृष्टिकोनातून कोविडचा आलेख आता घसरत आहे. नवीन रुग्णांसोबतच सक्रिय रुग्णांची संख्याही कमी होत आहे. सक्रिय प्रकरणांचा आकडा ६५ हजारांवरून ६३,३८० वर आला आहे. तथापि, अनेक राज्यांमध्ये कोविडच्या नवीन प्रकरणांमध्ये फारशी घट झालेली नाही. केरळमध्ये अजूनही १०,००० हून अधिक सक्रिय प्रकरणे आहेत, परंतु राज्यांचा सकारात्मकता दर खाली येऊ लागला आहे. दिल्लीतील संसर्गाचे प्रमाणही आता कमी होत आहे. तज्ञांचे म्हणणे आहे की हे शिखर पार झाल्याचे लक्षण आहे, जरी काही दिवस नवीन प्रकरणांवर लक्ष ठेवावे लागेल.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### ५१ व्या सरन्यायमूर्ती खन्नांचा कार्यकाळ केवळ ६ महिन्यांचा

नवी दिल्ली : सरन्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या सेवानिवृत्तीनंतर देशाचे ५१ वे सरन्यायमूर्ती न्या. संजीव शर्मा यांचा कार्यकाळ अवघा ६ महिन्यांचा असणार आहे. आगामी १३ मे २०२५ रोजी ते सरन्यायमूर्ती पदावरून सेवानिवृत्त होतील.

संजीव खन्ना यांचा वकिलीचा वारसा त्यांचे वडील देवराज खन्ना यांच्याकडून मिळाला. देवराज खन्ना दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश राहिले आहेत. तर संजीव खन्ना यांचे काका हंसराज खन्ना हे सर्वोच्च न्यायालयात सरन्यायमूर्ती होते. निवृत्त सरन्यायमूर्ती चंद्रचूड यांचा कार्यकाळ २ वर्षांचा होता. नवे सरन्यायमूर्ती संजीव खन्ना यांचा कार्यकाळ केवळ ६ महिने असेल.

आगामी १३ मे २०२५ रोजी ते सरन्यायमूर्ती पदावरुन निवृत्त होतील. संजीव खन्ना यांनी १९८३ मध्ये दिल्ली विद्यापीठातून कायद्याची पदवी घेतली. पुढे न्यायमूर्ती खन्ना यांनी दिल्लीच्या तीस हजारी न्यायालयातून वकिलीला सुरूवात केली. त्यानंतर ते आयकर विभाग आणि दिल्ली सरकारच्या नागरी प्रकरणांचे वकीलही होते. संजीव खन्ना २००५ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले. तब्बल १३ वर्षे दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश राहिल्यानंतर खन्ना यांना २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून बढती मिळाली. त्यांच्या या नियुक्तीला त्यावेळी विरोधही झाला होता. सर्वोच्च न्यायालयातील ६ वर्षांच्या कारकिर्दीत न्यायमूर्ती खन्ना यांनी ४०० पेक्षा अधिक न्यायपीठांचा भाग म्हणून काम केले. या वर्षी जुलैमध्ये न्यायमूर्ती खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठाने दिल्लीचे तत्कालिन मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना जामीन मंजूर केला होता. अलीगढ मुस्लिम विद्यापीठाला अल्पसंख्याक दर्जा देण्याचे समर्थनही त्यांनी केले होते.

### गोराईच्या जंगलात सापडला गोणीत भरलेला मृतदेह; ७ तुकडे, डोकं, हात-पाय प्लॅस्टिकच्या डब्यांमध्ये भरले

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यभरात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु असताना मुंबईतून एक खळबळजनक माहिती समोर आली आहे. मुंबईच्या पश्चिम उपनगरातील गोराई परिसरात गोणीत भरलेला एका मृतदेह सापडला आहे. या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, गोराईच्या बाबर पाडा येथे महाराष्ट्र पर्यटन विकास विभागाच्या जंगलसदृश भागात हा मृतदेह सापडला. या मृतदेहाचे डोके, हात-पाय, धड वेगवेगळे करण्यात आले होते. मृतदेहाचे एकूण सात तुकडे करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. हा मृतदेह नेमका कोणाचा आहे, याची माहिती अद्याप समोर येऊ शकलेली नाही.

गोराईच्या बाबर पाडा येथील पिक्सी रिसॉर्टला जाणाऱ्या रस्त्यावर शेफाली गावाजवळ मृतदेहाचे तुकडे असलेली ही गोणी सापडली. हा मृतदेह कोणाला सापडू नये म्हणून जंगलातील झुडुपांमध्ये ही गोणी टाकण्यात आली होती. हा मृतदेह कुजल्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली होती. त्यामुळे नागरिकांनी आजुबाजूला शोध घेतला असता दाट झाडीत ही गोणी सापडली. यामध्ये मृतदेह असल्याचे लक्षात आल्यानंतर पोलिसांना पाचारण करण्यात आले. पोलिसांनी ही गोणी उघडली तेव्हा त्यामध्ये प्लॅस्टिकच्या डब्यात विविध अवयव भरुन ठेवल्याचे आढळून आले. या मृतदेहाचे एकूण सात तुकडे करण्यात आले आहेत. या घटनेमुळे गोराई परिसरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी गोराई पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोणीत सापडलेल्या व्यक्तीची ओळख पटवण्याचे काम पोलिस करत आहेत. जेणेकरुन पुढचे धागेदोरे पोलिसांना मिळू शकतील. या व्यक्तीची हत्या कोणी केली असावी, त्याचे कारण काय असावे, या सगळ्याचा शोध सध्या पोलिसांकडून सुरु आहे.

पुण्यात रविवारी येरवडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत एक मृतदेह सापडला होता. या मृतदेहाचा काही भाग कुत्र्यांनी खाल्ला होता. न्याती बिल्डिंग समोरील झाडाझुडपात हा मृतदेह सापडला. अनेक दिवसांपासून हा मृतदेह याठिकाणी होता. त्यामुळे कुत्र्यांनी या मृतदेहाचा बरासचा भाग खाल्ला होता. मृतदेहाच्या कमरेच्या खालील भाग थोडाच शिल्लक होता. मृतदेहाची कवटी आणि वरील भाग कुत्र्यांनी पूर्णपणे खाल्ल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी हा मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला. या परिसरात अनेक बेघर लोक झोपतात. त्यापैकी एखाद्या व्यक्तीचा हा मृतदेह असावा, असा पोलिसांचा अंदाज आहे. पोलीस सध्या त्यादृष्टीने पुढील तपास करत आहेत.

### संजय लीला भन्साळींनी सेटवर केला एवढा 'छळ', चित्रपट सोडणार होता रणबीर कपूर

**मुंबई/प्रतिनिधी :** रणबीर कपूर आणि सोनम कपूर यांनी १७ वर्षांपूर्वी बॉलिवूडमध्ये प्रवेश केला होता. त्यांचा पहिला चित्रपट 'सावरियां' होता. संजय लीला भन्साळी दिग्दर्शित 'सावरियां' ९ नोव्हेंबर २००७ रोजी मोठ्या पडद्यावर आला. हा चित्रपट चालला नसला, तरी आजही त्याची चर्चा आहे. मात्र, शूटिंगदरम्यान जवळपास परिस्थिती अशी बनली की रणबीर कपूर हा चित्रपट सोडणार होता. त्या मागे काय कारण होते, हे आम्ही तुम्हाला सांगतो. प्रकरण २०१६ सालचे आहे. रणबीर कपूर नेहा धुपियाच्या शो नो फिल्टरमध्ये नेहासोबत पोहोचला होता. यादरम्यान त्याला सावरियांच्या शूटिंगचे दिवस आठवले. सेटवर आपल्यावर अत्याचार होत असल्यासारखे वाटू लागल्याचे त्याने सांगितले. संजय लीला भन्साळी यांनी रणबीर कपूरला त्याच्या सीमा तोडण्यास सांगितले.

रणबीरने सांगितले की, काही काळानंतर ते खूप कठीण झाले. मला इतका त्रास होऊ लागला की एका क्षणी मी चित्रपट सोडणार होतो. मला वाटते की हे १० किंवा ११ महिन्यांनंतर होते. मला वाटू लागले, ऐका, मी हे करू शकत नाही, ते माझ्यावर कब्जा करत आहे. रणबीरने सांगितले होते की त्याच्या संवेदनशील आणि भावनिक स्वभावामुळे संपूर्ण प्रक्रिया आणखी कठीण झाली आहे. संजय लीला भन्साल त्याला चांगले ओळखत होते, म्हणून त्यांनी त्याला त्याच्या सीमा तोडण्यास भाग पाडले, जे रणबीरला हाताळणे खूप अवघड होते.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कारकीर्द आता कुबड्यांवर आहे

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा टीका

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** महाराष्ट्राला लागलेली भाजपची कीड ही सत्तेतून बाहेर काढणे हेच माझे ध्येय आहे. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहा वर्ष बहुमताने सत्ता चालविली मात्र आज त्यांची कारकीर्द ही कुबड्यांवर आहे. अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली. ते बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथे दि.११ नोव्हेंबर रोजी महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ सभेत बोलत होते. यावेळी त्यांनी महाराष्ट्र द्रोही व शेतकऱ्यांच्या विरोधातील सरकार जे ओबीसींना कुत्रा म्हणायला पण मागेपुढे पाहत नाही अशा व्यवस्थेला पहिल्यांदा सत्ते बाहेर काढायचे आहे असे म्हणत विरोधकांवर टीका केली. तर नितीन गडकरी पण २०१४ पासून मी पाहतो आहे, मी २०१९ मध्ये त्यांच्या विरोधात लढलो आहे ते पण प्रधानमंत्री पदाचे उमेदवार म्हणून नागपूरमध्ये मिरवतात. मात्र त्यांची दरवेळेस निराशा होते, अशी टीकाही त्यांच्यावर केली. भाजप जवळ हिंदू-मुस्लिम शिवाय दुसरा पर्याय नाही आणि माध्यमांनी पण त्यांना फार सिरीयस घेऊ नये असे म्हणून अमित



शहांवर टीका केली. तर मोदी किंवा अमित शहा यांना शेतकऱ्यांबद्दल का बोलत नाही, असा प्रश्न विचारण्याची गरज निर्माण झाली आहे.त्यांनी सोयाबीनला भावाबद्दल, कापसाच्या भावाबद्दल किंवा बेरोजगाराबद्दल बोलावे, यावर बोलताना यांचे तोंड शिवले जात आहे. निवडणुका आल्या की हिंदू मुसलमान करायचे आणि विभाजन करायचे विभाजन सुद्धा इंग्रजांसारखे करायचे ही महाराष्ट्राची परंपरा नाही. हा छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे. या महाराष्ट्राला अमित शहा व मोदी यांनी एटीएम बनवून ठेवले आहे व ते पूर्ण महाराष्ट्राला लुटत आहेत. त्यामुळे हिंदू मुस्लिम वाद जो महाराष्ट्रामध्ये विष पेरले जातो तर महाराष्ट्रातील जनता ते स्वीकारणार नाही, भाजप ओबीसीला कुत्रा म्हणत असेल त्या ओबीसी लोकांनी निवडणुकीमध्ये भाजपला जागा दाखविण्याची वेळ आली आहे. महाविकास आघाडीमध्ये एकत्रित आहे पण भाजप आणि महायुतीमध्ये एकत्रित जाहीरनामा तयार केला नसल्याचे दिसत आहे, त्यांच्या अलायन्समध्ये वेगवेगळ्या जाहीरनामा तयार केला आहे. त्यामुळे त्यांचे हालत फार गंभीर असल्याची टीकाही पटोले यांनी केली. उद्धव ठाकरे संतापतील कारण एकीकडे भाजपचे मुख्यमंत्री हेलिकॉप्टरमध्ये बॅगा घेऊन जाताना आपण पाहिले होते. परंतु, त्यांच्या बॅगा तपासल्या नाहीत, तर उद्धव ठाकरे यांचीची बॅग तपासली आहे.हे बरोबर नाही, सगळ्यांच्याच बॅगा तपासल्या पाहिजे, आमची सुद्धा बॅगा तपासले पाहिजे, मात्र हे सत्तेचा दुरुपयोग करीत आहेत. महाराष्ट्रामध्ये आज दोन पोलिस महासंचालक पगार सुरू आहे. एक रिटायर झालेले महासंचालक आहे तर एक तात्पुरते पोलीस महासंचालक आहेत. भ्रष्ट महायुती सरकारने बसवून ठेवला आहे, तर देशाचे प्रधानमंत्री हे दहा वर्ष बहुमताचे प्रधानमंत्री राहिले आहेत. आता त्यांची कारकीर्दही कुबड्यावर आहे. या देशामध्ये इंदिरा गांधी, राजीव गांधी यांनी देशाच्या एकात्मतेसाठी त्यांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले आहे. पण आपल्याला स्वतःला स्वयंभू विश्र्वगुरू म्हणणारे मोदी महाराष्ट्रामध्ये मतांचा जोगवा मागत असताना कटोगे तो बटोगे असं म्हणायची वेळ आली आहे असा कमजोर प्रधानमंत्री पहिल्यांदा पाहिला आहे अशी टीकाही यावेळी पटोले यांनी मोदींवर केली.तसेच यावेळी त्यांनी ३७० कलम हटवल्यानंतर काय प्राप्त केले याचे उत्तर त्यांनी द्यावे, त्यांनी पाकव्याप्त काश्मीर आपल्या ताब्यात घेतला नाही, तुम्ही देशाचे गृहमंत्री आहात जनतेची दिशाभूल करू नये, राहुल गांधींच्या प्रत्येक गोष्टीवर टीका करण्याचे काम हे लोक करतात. नक्षलवादी म्हणायचे आणि जे काल संविधानाचा पुस्तक राहुल गांधी जनतेला दाखवतात त्या लाल रंगावरून भाजपालांना ऑब्जेक्शन आहे तर मग नरेंद्र मोदी यांनी आपल्या देशाचे त्यावेळेसचे तत्कालीन राष्ट्रपती गोविंद यांना लाल संविधानाचे पुस्तक दिले हे काय नक्षलवादी किंवा आतंकवादी आहेत का ?असा प्रश्र्नही यावेळी त्यांनी केला. जनतेच्या मूळ प्रश्र्नावर भाजप का येत नाही असे प्रश्र्न काढून काय दावे करतात, जनतेच्या प्रश्र्नाला उत्तर देण्यापेक्षा पळ काढण्याची भाजपची रणनीती आहे. भारत जोडो यात्रा ज्या ठिकाणाहून गेली तेथील जागेवर भाजप लक्ष ठेवून आहेत. आम्ही सर्व निवडणुका या ठिकाणी जिंकलो आहोत, त्यामुळे भाजपने बारकाईने लक्ष ठेवण्याची हे स्वाभाविक आहे. तर विदर्भातही सगळ्यात जास्त जागा महाविकास आघाडी जिंकेल त्याचे उत्तर तुम्हाला २३ नोव्हेंबर ला पाहायला मिळणार असा विश्र्वासही यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी यावेळी व्यक्त केला.

## सलमान, शाहरुखनंतर मिथुन चक्रवर्तींना मिळाली धमकी; पाकिस्तानी डॉननं १०-१५ दिवसात दिला माफी मागण्याचा सल्ला

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेता सलमान खान आणि शाहरुख खाननंतर आता मिथुन चक्रवर्ती यांनी धमकी मिळाली आहे. पाकिस्तानी डॉन शहजाद भट्टीनं दुबईहून त्यांना धमकी दिली आहे. त्यासोबत मिथून यांना माफी मागण्यास सांगितले आणि याशिवाय त्यांनी सांगितलं की जर असं झालं नाही तर त्यांना पश्चाताप करण्याची वेळ येईल. त्याचे दोन व्हिडीओ सोशल मीडियावर समोर आले आहेत, ज्यात मिथुन चक्रवर्ती यांना धमकी देण्यात आली आहे.



खरंतर, मिथुन चक्रवर्ती यांनी गेल्या महिन्यात उत्तर २४ परगना जिल्ह्यात एका पार्टी कार्यक्रमा दरम्यान, कथितपणे भडकवणारे भाषण दिले होते. त्यानंतर त्यांच्या विरोधात इर्धी दाखल करण्यात आली. पण मिथुन चक्रवर्ती या भाषणात असं काय म्हणाले की त्यांच्या विरोधात ही इर्धी दाखल करण्यात आली. 'आज मी एक अभिनेता म्हणून नाही तर ६० ज्या दशकातील मिथुन चक्रवर्ती बोलतोय. रक्तरंजित राजकारण मी फार जवळून पाहिलं असल्याने माझ्यासाठी हे डावपेच काही नवीन नाहीत. कोणती स्टेप घेतल्यानं कोणतं काम होईल हे मला चांगलचं माहित आहे. मी केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांच्यासमोर हे बोलत आहे की त्यासाठी जे काही करणं गरजेचं असेल ते मी करेन. इथल्या एका नेत्यानं मला सांगितलं की हिंदूची हत्या करून त्यांना भागिरथीमध्ये वाहून देऊ. मला वाटलं होतं की मुख्यमंत्री त्यावर काही बोलतील, पण काहीच बोलले नाही, पण मी बोलतोय की तुम्हाला तुमच्याच जमिनीत पुरेन', असं मिथुन चक्रवर्ती म्हणाले.

दरम्यान, मिथुन यांच्या याच वक्तव्यावर शहजाद भट्टी संतापला आणि त्यानं धमकी देणारा व्हिडीओ शेअर केला. त्या व्हिडीओत त्यानं म्हटलं की '१०-१५ दिवसात माफी मागा, कथितपणे ते त्या वक्तव्यात मुस्लिमांची हत्या करुन त्या जागी फेकून देणार म्हणाले.'

पुढे शहजाद हा मिथुन यांच्या चित्रपटांचा उल्लेख करत म्हणाला, 'तुम्ही आमचं मन दुखावलं आहे. तुमचे मुस्लिम चाहते आहेत. त्यांनी देखील तुमचा आदर केला आहे. तुमचा चित्रपट फ्लॉप असला तरी त्यांनी पाहिले आहेत. तुम्ही जर पोटभर खाऊ शकत आहात तर त्याचं कारण तेच आहेत. तुमच्या वयाचे लोक वायफळ गप्पा मारतात आणि त्यानंतर त्यांना यावरून पश्चाताप करावा लागतो.'

शहजाद पुढे म्हणाला, 'स्टेजवर जाऊन जे काही करत आहात, मी व्हिडीओ शूट करुन कोणाला धमकी देत नाही. हा कोणताही चित्रपट नाही खरं आयुष्य आहे. सध्या हाच सल्ला आहे की त्या लढाईविषयी विचार करु नका जी तुम्ही जिंकू शकत नाही. कारण त्यानं फक्त मान खाली होणार.'

दरम्यान, असं म्हटलं जातं की शहजाद आणि लॉरेंस बिष्णोई यांचे चांगले संबंध आहेत. त्यानं ईदच्या निमित्तानं लॉरेंसला तुरुंगात व्हिडीओ कॉल केल्याचे म्हटले जाते. त्याशिवाय त्यानं दावा केला की सलमान आणि लॉरेंस या दोघांची समजूत काढण्याचा देखील प्रयत्न केला.

## धर्माचं राजकारण करणाऱ्या पक्षावर रितेश देशमुखची 'लय भारी' टीका; म्हणाला, 'सरकार येणार तर महाविकास आघाडीचेच'

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** लोकसभेला जे वारं होतं, तेच वारं आताही आहे, असे म्हणत अभिनेते रितेश देशमुख यांनी आपले लहान भाऊ धीरज विलासराव देशमुख यांच्यासाठी लातूर ग्रामीण येथे प्रचार सभा घेतली. यावेळी त्यांनी शिक्षणाचा लातूर पॅटर्न महाराष्ट्रात प्रसिद्ध असल्याचे सांगितले पण लातूरमधील मुलांनाच रोजगार नाही. रोजगार देण्याची सरकारची जबाबदारी आहे. पण लोकांकडे रोजगार नाही. पिकांना भाव नाही. येत्या २० तारखेला मतदारांनी मतदान करताना या मुद्द्यांचा विचार करावा, असे आवाहन रितेश देशमुख यांनी केले. तसेच भाजपाकडून होत असलेल्या धर्माच्या प्रचारावरही रितेश देशमुख यांनी जोरदार टीका केली.भगवान श्रीकृष्णाचा दाखला देऊन रितेश देशमुख म्हणाले, ''कर्म हाच धर्म आहे. काम करत राहणे म्हणजे कर्म करणे आणि कर्म म्हणजेच धर्म. जो प्रामाणिकपणे काम करतो, त्यालाच धर्म करणे म्हणतात. पण जो काम करत नाही त्याला गरज पडते धर्माची. सगळे म्हणतात की धर्म धोक्यात आहे, प्रत्येक पक्ष म्हणतो धर्म धोक्यात आहे. धर्म बचाव, धर्माला वाचवा, असं म्हटलं जातंय. आमचा धर्म आम्हाला प्रिय आहे. प्रत्येक व्यक्तीला आपला धर्म प्रिय असलाच पाहिजे.

खरं म्हणजे ते (राजकीय पक्ष) धर्माला प्रार्थना करतात की, आमचा पक्ष धोक्यात आहे, आम्हाला वाचवा. काही गरज नाही अशा भुलथापांना बळी पडायची.''

रितेश देशमुख मतदारांना आवाहन करताना म्हणाले, जे धर्माची गोष्ट करतात, त्यांना सांगा धर्माचं आम्ही बघून घेतो, आधी आमच्या कामाचं बोला. आमच्या पिक-पाण्याला काय भाव देणार, आमच्या आई-बहिणी सुरक्षित आहेत की नाही, हे सांगा. २० नोव्हेंबरनंतर धीरज देशमुख यांच्याकडे फार मोठी जबाबदारी येणार आहे. अमित देशमुख आणि धीरज देशमुख यांच्याकडे काम करण्याची धमक आहे. यावेळी सरकार महाविकास आघाडीचंच येणार, याबद्दल मला शंका नाही.

भाजपाकडून बटेंगे तो कटेंगेची घोषणा

भाजपाचे नेते आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बटेंगे तो कटेंगे असा नारा दिला असून महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत हा चर्चेतला मुद्दा करण्याचे भाजपाचे प्रयत्न आहेत. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ''एक है तो सेफ है'', अशी घोषणा दिली. आज राज्यातील प्रमुख वर्तमानपत्रातील पहिल्या पानांवर या घोषणेची जाहिरात देण्यात आली आहे. भाजपाच्या या घोषणेला प्रत्युत्तर देताना काँग्रेसकडून 'जुडेंगे तो जितेंगे' ही घोषणा दिली आहे. उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेसची ही घोषणा लोकसभा निवडणुकीत लोकप्रिय ठरली होती.

भाजपाच्या या घोषणेवर महाविकास आघाडीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी टीका केली आहे. ''सत्ताधारी पक्षाची जातीयवादी भूमिका समोर आली आहे. अर्थात ते जातीयवादी आहेतच, पण या घोषणेनं ते अधोरेखित केले. निवडणुका येतात आणि जातात. पण दोन धर्मामध्ये किंवा दोन जातींमध्ये तेढ निर्माण करण्याचं काम कुणी करता कामा नये. पण त्याचं भान भाजपा किंवा त्यांच्या मित्रपक्षांना नाही, अशी टीका शरद पवार यांनी केली.

## रोहित शर्माची कर्णधारपदावरुन तडकाफडकी उचलबांगडी?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय कसोटी संघाचा कर्णधार रोहित शर्मा ऑस्ट्रेलियन दौऱ्याच्या पहिल्या कसोटी सामन्यामध्ये सहभागी होणार नसल्याचं स्पष्ट झालं आहे. पर्थ येथे होणाऱ्या कसोटीसाठी भारतीय संघ टप्प्याटप्प्यात रवाना होत आहे. मात्र असं असतानाच बॉर्डर-गावसकर चषकाच्या संपूर्ण स्पर्धेसाठी रोहित शर्माला डच्चू देण्यात आला आहे की काय अशी शंका उपस्थित करण्यात येत आहे. यामागील कारण ठरलं आहे, ऑस्ट्रेलियन प्रसारमाध्यमं!

नेमकं घडलं काय?

झालं असं की, फॉक्स क्रिकेट वाहिनीवरुन ऑस्ट्रेलियामध्ये बॉर्डर गावसकर चषक मालिका लाइव्ह दाखवली जाणार आहे. मात्र याच वाहिनीवरील एका फोटोने सोशल मीडियावर धुमाकूळ गातला आहे. रविवारी पर्थच्या मैदानावर पाकिस्तान आणि ऑस्ट्रेलियादरम्यान तिसरा एकदिवसीय सामना खेळवण्यात आला. या सामन्यादरम्यान फॉक्स क्रिकेट वाहिनीवर भारत आणि ऑस्ट्रेलियादरम्यानच्या कसोटी मालिकेचा तपशील दाखवण्यात आला. मात्र या इन्फोग्राफिकमध्ये भारताचा कर्णधार म्हणून रोहित शर्माऐवजी विराट कोहलीचा फोटो दाखवण्यात आला आहे. एकीकडे ऑस्ट्रेलियन कर्णधार पॅट कमिन्स आणि दुसरीकडे विराट कोहली असा फोटो पाहून अनेकांच्या भुवया उंचावल्या आणि संपूर्ण मालिकेसाठी रोहित शर्माला डच्चू देण्यात आला आहे की काय अशी चर्चा सुरु झाली.

...म्हणून झळकला विराट?

आता विराट कोहलीचा फोटो का दाखवण्यात आला याबद्दल वेगवेगळे तर्क मांडले जात असतानाच विराटची ऑस्ट्रेलियाविरुद्धची दमदार कामगिरी यासाठी कारणीभूत असल्याचं चाहत्यांचं म्हणणं आहे. ऑस्ट्रेलियात खेळवण्यात आलेल्या मागील १३ सामन्यांमध्ये विराट कोहलीने १३५२ धावा केल्या असून त्याची धावांची सरासरी ५४ इतकी राहिली आहे. विराटने एकूण ६ शतकं आणि चार अर्धशतकं झळकावली आहेत. २०१४-१५ च्या दौऱ्यात विराटने ८६.५० च्या सरासरीने ६९२ धावा केल्या.

## महाराष्ट्रात विकासाला गती देणारे सरकार आणण्यासाठी कार्यकर्त्यांमध्ये उत्साह- डॉ श्रीकांत शिंदे

दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी:** भिवंडी पूर्व विधानसभेचे महायुती शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार संतोष शेट्टी यांच्या प्रचारार्थ शिवसेना नेते खासदार श्रीकांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत महायुतीच्या कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी खासदार नरेश म्हस्के, शिवसेना नेते प्रकाश पाटील, उपनेते माजी आमदार रुपेश म्हात्रे यासोबतच शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, आरपीआय आठवले गट, आरपीआय एकतावादी पक्षाचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रम प्रसंगी शिवसेना उबाठा गटाचे प्रमुख रितेश जाधव व त्यांच्या समर्थक कार्यकर्त्यांनी शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश केला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात महायुतीचा जोरदार प्रचार सुरू असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात भिवंडी पूर्व विधानसभेची निवडणूक आम्ही लढतो आहे. या ठिकाणी उमेदवार संतोष शेट्टी यांच्या प्रचारार्थ आयोजित केलेला मेळाव्याला उत्स्फूर्त असा प्रतिसाद प्रमुख पदाधिकारी कार्यकर्त्यांनी दिलेला आहे. महायुतीचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या नेतृत्वात सव्वा दोन वर्ष केलेल्या विकासात्मक कार्यावर जनतेचा विश्र्वास आहे त्या जीवावर आम्हाला विजय नक्कीच मिळेल हा विश्र्वास आहे. महायुतीच्या विकास कार्यामुळे सगळी कडे चांगलं वातावरण आहे. आजही शिवसेने मध्ये मोठ्या प्रमाणावर प्रवेश करत आहेत. रुपेश म्हात्रे यांनी मोठ्या मनाने उमेदवारी मागे घेतली, अनेक कार्यकर्ते प्रवेश करतात त्यामुळे ही मोठी ताकद आमच्या पाठीशी उभे राहिल्याने संतोष शेट्टी विधानसभेत नक्कीच पोहोचतील. त्यांनी भिवंडी शहरात नगरसेवक म्हणून चांगलं काम केलेलं आहे त्यावर येथील जनता



विश्र्वास ठेवेल. सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांमध्ये चांगले समन्वय आहे. चांगल्या वातावरणात प्रचार होत असल्याने आम्ही मोठ्या मताधिक्याने विजय होऊ असा विश्र्वास खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

# आरक्षणाची लढाई ही मोर्चे काढून नव्हे तर विधानसभेत जाऊन जिंकावी लागेल : अॅड. प्रकाश आंबेडकर

## मेहकर येथे वंचितचे उमेदवार डॉ.सौ. ऋतुजा चव्हाण यांच्या प्रचारार्थ भव्य जाहीर सभा

**मेहकर / प्रतिनिधी:** आरक्षण हे संविधानाचे हृदय आहे, आरक्षणाची लढाई ही मोर्चे आंदोलने करून जिंकली जाऊ शकत नाही, तर ती विधानसभेत जाऊन जिंकावी लागेल, त्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना प्रचंड मताने विजयी करून वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार विधानसभेत पाठवा, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा अॅड्. प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांनी केले. ते मेहकर येथे दि.११ नोव्हेंबर रोजी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ. सौ. ऋतुजा ऋषांक चव्हाण यांच्या प्रचारार्थ आयोजित भव्य सभेत बोलत होते.

या सभेला लोणार तालुकाध्यक्ष दिलीप राठोड, मेहकर तालुकाध्यक्ष गोविंद भाई, रिसोड विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार प्रशांत गोळे, जिल्हाध्यक्ष निलेश जाधव, प्रा. शेजुळ सर, सुरेश पवार, उपाध्यक्ष धैर्यवान फुंडकर यांच्यासह विविध मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रकाश आंबेडकर यांनी महापुरुषांना अभिवादन केले. त्यानंतर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने उमेदवार डॉ.सौ.ऋतुजा चव्हाण यांनी अॅड्. प्रकाश आंबेडकर यांचा भव्य सत्कार केला.

यावेळी भीमसेनेच्या वतीने अॅड्. प्रकाश आंबेडकर यांना सलामी देण्यात आली. यावेळी पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, ही विधानसभेची निवडणूक आगळ्यावेगळ्या पद्धतीने लढवली जात आहे. विषय कुठला आणि प्रश्न कुठला अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ७० वर्षानंतर विरोधी पक्ष नेते राहुल गांधी व देशाचे गृहमंत्री अमित शहा, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी तर आता वेगळाच वाद सुरू केला आहे. यांनी घटनेचा कलर लाल आहे असे म्हणत आहेत आणि घटना लाल करण्याची भाषा करीत आहेत. हे दोघेही लोकसभेपासून ते आजपर्यंत नकली भांडण करत आहेत ते आता सिद्ध झाले आहे. त्यामुळे असे शब्द वापरले जात आहेत. फसवे राजकारण सुरू आहे. देशातील लोकशाहीवादी व संविधानवादी मतदारांनी या भाजपला मात्र जागा दाखविली आहे.

भाजप लोकसभेत म्हणत होते की, आम्ही ४०० पार आलो तर संविधान बदलू, मात्र मतदारांनी त्यांना अर्ध्यावर आणून ठेवले आहे. त्यामुळे येणाऱ्या १०० वर्षात कोणताही पक्ष संघटनाही संविधान बदलू अशी भाषा वापरणार नाही, नरेंद्र मोदी संधी मिळाले की संविधान उचलतात आणि डोक्याला लावून म्हणतात हे राजकीय बायबल आहे, असे म्हणून राजकारण करीत आहेत. आता संविधानाचा मुद्दा संपला आहे. या निवडणुकीत एका बाजूला विकास आणि दुसऱ्या बाजूला आरक्षण आहे. आरक्षणासंदर्भात मनोज जिरंगे पाटील यांनी ओबीसीमधून आरक्षण द्यावे,अशी मागणी केली आहे. तर याच आरक्षणावर प्रमुख पक्ष एकत्र येऊन लढत आहेत. त्यामुळे त्यांनी विधानसभेतून माघारही घेतली आहे. मराठ्यांना आरक्षण ही ओबीसी मधून द्यायचे की नाही हे ओबीसी मतदारांना ठरवायचे आहे आणि या आरक्षणाचे काम हे विधानसभेनंतर होणार आहे. त्यातही एक राजकीय खेळी खेळली जाणार आहे. आता तर स्थानिक स्वराज्य निवडणुका महाराष्ट्र शासनाने स्थानिक स्वराज्य निवडणुका घ्याव्या,असा निर्णय दिला आहे. निवडणुका घेताना ओबीसी आरक्षण राहणार नाही, या ठिकाणी जनसंख्या किती आहे हे माहीत नाही, त्यामुळे सरसकट २७ टक्के आरक्षण नंतर हा खेळ विधानसभेत केला जाईल, नंतर ठराव आणला जाईल, ओबीसी जनगणना करावी तोपर्यंत नोकरी व शिक्षणाचे आरक्षण सुद्धा थांबवण्याचा खेळ खेळला जाणार आहे. ओबीसी मतदारांनी हे लक्षात घ्यावे, नोकरी, शिक्षण यासह सर्वच ठिकाणचे आरक्षण हे या खेळामुळे थांबणार आहे. म्हणून या आगळ्यावेगळ्या निवडणुकीत खेळीत वंचित ओबीसीच्या ताटात मराठ्यांना न बसवता वेगळे ताट करावे ही वंचितची भूमिका पहिल्यांदा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने मी स्पष्ट केली आहे. देशाचा पंतप्रधान सारखा माणूस हा धर्माच्या नावावर प्रचार करतो, इतिहास कापण्याचे काम हे मोदी व त्यांच्या पक्षाने केलेले आहे. त्यामुळे ओबीसीने सावध राहावे, धर्म अबाधित आहे. संकट आरक्षणावर आहे. ओबीसीचे आरक्षण धोक्यात आहे. तशाच प्रमाणे एससी एसटीचे आरक्षण सुद्धा धोक्यात आहे. एससी, एसटी वर्गीकरण करून क्रिमिनल चे नवे तत्व आणल्यामुळे एससी एसटी आरक्षण धोक्यात आले आहे. त्यामुळे शिक्षण नोकरी धोक्यात येऊ शकते. शिकलेले आणि विना शिकलेले असे वर्गीकरण होऊन ज्या कुटुंबात एकदा आरक्षणाचा फायदा घेतला आहे ते कुटुंब क्रिमिनल मध्ये येईल, त्यामुळे आरक्षणाच्या यादीतून त्या कुटुंबाला बाहेर केल्या जाईल. हा निर्णय बीजेपी, काँग्रेस, दोनही सेना आम्ही लागू करू असे म्हणत आहे हे दुर्दैव आहे. आदिवासी यांनाही क्रिमिनल लागू करण्याचा निर्णय दिला आहे. आरक्षण अधिक प्रमोशन हा प्रश्न केवळ मोर्चे काढून थांबणार नाही तर, विधानसभेत वंचितचा आमदारच बदलू शकतो. ही लढाई सभागृहात करावी लागेल. त्यासाठी विधानसभेत ही लढाई लढावी लागेल असे मत त्यांनी व्यक्त केले. वंचितच्या उमेदवारांनी वर्गीकरण क्रिमिनल हे मॅटर पॉलिसी आहे का हे ठरवावे नंतर त्यांच्या विरोधात विधानसभेच्या माध्यमातून लढावे लागेल जाऊ शकते आरक्षण हे माणसाप्रमाणे आहे. जसे माणसाच्या शरीरातून हृदय काढले तर त्याचे मृत्यू होतो त्याचप्रमाणे संविधानातून आरक्षण काढले तर त्याला काहीच फायदा राहणार नाही, त्यानंतर शिक्षण नोकरी स्कॉलरशिप हे सगळे बंद होणार आहे. नंतर तुम्ही जिवंत असूनही मेल्यासारखे राहणार आहे. त्यामुळे एससी, एसटी ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना प्रचंड मताने विजयी करावे, असे आवाहन यावेळी वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा अॅड्. प्रकाश आंबेडकर यांनी केले.









### विविध मान्यवरांचे मनोगत

वंचित बहुजन आघाडीचे मेहकर लोणार विधानसभा मतदार संघाचे उमेदवार डॉ. सौ. ऋतुजा ऋषांक चव्हाण यांच्या प्रचार सभेसाठी आयोजित वंचित बहुजन आघाडीचे सर्वे सर्वा अॅड्.प्रकाश आंबेडकर याची मेहकर येथे सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेपूर्वी रिसोड विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार प्रशांत गोळे, वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी धैर्यवान फुंडकर, कारंजा लाड येथील श्रीकांत ठाकरे, वसंतराव वानखेडे, प्रा. शेजुळ सर यांनी मनोगत व्यक्त करून वंचित बहुजन आघाडीच्या ध्येयधोरणे व बहुजन विकास बहुजन जनाच्या विकासासाठी वंचित बहुजन आघाडीची भूमिका यावर मनोगत व्यक्त करून वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ. सौ. ऋतुजा चव्हाण यांना विजयी करण्याचे आवाहन केले.

### ऋतुजा चव्हाण यांच्याहस्ते प्रकाश आंबेडकर यांचा जंगी सत्कार

वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा अॅड्. प्रकाश आंबेडकर हे मेहकर येथे वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ आले असता वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ.सौ. ऋतुजा ऋषांक चव्हाण व ऋषांक चव्हाण यांच्या वतीने अॅड्. प्रकाश आंबेडकर यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

### ऋतुजा चव्हाण यांनी घेतला विरोधकाचा समाचार

वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ.सौ.ऋतुजा ऋंषाक चव्हाण यांनी मेहकर लोणार मतदार संघातील विकासाबाबत विरोधकांचा चांगला समाचार घेतला.अनेक वर्ष सत्ता उपभोगल्यानंतरही गावात रस्ते नाहीत, पाणी नाही, नाल्या नाहीत आणि बैलगाडीने प्रचार करण्यासाठी जात आहेत. मतदार संघातील रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. असे मत व्यक्त करून विरोधकांवर चांगलाच समाचार घेतला.

## विविध वृत्त...

### आज चिखली विधानसभा मतदारसंघात राहुल गांधी यांची जाहीर सभा



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा / प्रतिनिधी:** संपूर्ण विदर्भातील जनतेचा गांधी घराण्यावर प्रेम आहे. निश्रि्चत भक्ती आहे त्यामुळे गांधी घराण्यातील कोणीही येत असेल तरी संपूर्ण विदर्भ जो आहे ऊर्जावान होऊन जातो. इंदिरा गांधी यांच्यानंतर तब्बल ४४ वर्षाने राहुल गांधी येत आहेत अशी प्रतिक्रिया महाविकास आघाडीचे काँग्रेसचे उमेदवार राहुल बोंद्रे यांनी दिली आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार राहुल बोंद्रे यांच्या प्रचारार्थ काँग्रेसचे नेते राहुल गांधी हे उद्या बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. चिखली येथे जाफराबाद रोडवरील मैदानावर राहुल गांधी यांची प्रचार सभा आयोजित करण्यात आली आहे.

### राहुल गांधीच काय सोनिया गांधी आल्या तरी हवा पलटू शकत नाही; जनता हेच आमचे नेते- श्वेता महाले

**बुलढाणा / प्रतिनिधी:** अतिशय उत्स्फूर्त असा प्रतिसाद मतदारांमधून मिळत आहे खास करून लाडकी बहीण गावागावात रांगोळ्या टाकून, फुलांच्या वर्षाव करत स्वागत करत आहेत. कुठलाही नेता येऊन हवा बदलत नसते. मतदारांना काम करणारा व्यक्ती पाहिजे असतो, मतदारांना विकास करणारा लोकप्रतिनिधी हवा असतो. दहा वर्षे राहुल बोंद्रेंना दिली होती त्यावेळी त्यांनी काय केलं याचा हिशोब जनता निश्रि्चतच घेत आहे. मतदार संघात पांदण रस्ते,दोन गावे जोडणारा रस्ता करणारा लोकप्रतिनिधी पाहिजे, जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा करणारा लोकप्रतिनिधी पाहिजे सर्व विकासकामे या अडीच वर्षाच्या काळात आम्ही केली आहेत. राहुल गांधीच काय सोनिया गांधी जरी आल्या तरी हवा पालटू शकत नाही अशी प्रतिक्रिया महायुतीच्या उमेदवार श्वेता महाले यांनी दिली आहे.



## निवडणुकीसाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांकडून अपक्ष उमेदवाराला एक महिन्याचे निवृत्त वेतन

### नागपुरात अतुल खोब्रागडेंचे प्रस्थापित पक्षांना आव्हान?

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर / प्रतिनिधी :** निवडणूक म्हटली तर पैसा आलाच. मात्र, एखादा उमेदवाराच्या पाठिशी उभे राहून त्याला समाजातून स्वत:हून आर्थिक मदत करण्याचा हल्ली काळ तसा जवळ जवळ नाहीच. असे असले तरी उत्तर नागपूर विधानसभा म तदारसंघातील अपक्ष उमेदवार अतुल खोब्रागडे यांच्याबाबतीत हा अपवाद खरा ठरला आहे. अतुल खोब्रागडे यांच्या युवा ग्रॅज्युएट फोरमसोबत जुडलेल्या नॉर्थ नागपूर सिनिअर सिटीझन फोरमच्याच्या सेवानिवृत्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एका म हिन्याचे निवृत्त वेतन खोब्रागडे यांच्या निवडणुकीसाठी दिले आहे. तसेच समाजाने नव्या नेतृत्वाला खुल्या हाताने मदत करावी, असे आवाहन देखील केले आहे.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांकडून आर्थिक मदत

या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी सांगितले की, अनेक वर्षापासून आम्ही उत्तर नागपूरमध्ये राहतो. आज राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध शासकीय सेवांमधून निवृत्त झालो आहोत. वयाच्या ६० ते ६५ नंतरही उत्तर नागपूरचे चित्र तसेच आहे. विकास हा केवळ कागदावर असून येथील समस्यांचा सामना रोज करावा लागतोय. आपल्या अनेक बांधवांना मुलांच्या शिक्षणाकरीता चांगल्या शाळा, चांगले शिकवणी वर्ग, नोकरीच्या संधी, चांगल्या आरोग्य सुविधांच्या शोधात आजही उत्तर नागपूर आहे. तीन वर्षाआधी युवा ग्रॅज्यूऐट फोरमच्या संपर्कात आल्यावर एक चांगले काम करण्याची संधी मिळाली.

सिनिअर सिटीझन फोरमच्या माध्यमातून अनेक विकासकार्य

युवा ग्रॅज्यूएट फोरमचे अतुल खोब्रागडे या तरूणाने आम्हाला नॉर्थ नागपूर सिनिअर सिटीझन फोरमच्या माध्यमातून एकत्र आणले आणि उत्तर नागपूरच्या समस्या सोडविण्यासाठी प्रेरीत केले. अतुलच्या सोबतीने आम्ही उत्तर नागपूरच्या अनेक समस्यांना सोडवल्या. कंन्व्हेंशन सेंटर, पाटणकर उद्यान, आवळे बाबू स्मारक, बर्डी मुख्य मार्ग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, इंदोरा मेट्रो स्टेशन यासारखे अनेक मुद्दे मार्गी लावलेले आहेत. अतुल खोब्रागडे यांना प्रामाणिकपणा, बाबासाहेबांच्या विचारांप्रती समर्पण, प्रशासनाकडून कामे करवून घेण्याची शैली अतिशय वाखान्याजोगी आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीमध्ये अशा समर्पित कार्यकर्त्यासोबत आम्ही सर्व उभे आहोत असेही सांगितले.

### प्रकाश मोगले यांच्या 'दिशा' कथासंग्रहावर रविवारी एक दिवशीय चर्चासत्र

**नांदेड / प्रतिनिधी :** मैत्री पब्लिकेशन आणि लोकायत विचारमंच यांच्या संयुक्त विद्यमाने प्रकाश मोगले यांच्या 'दिशा' कथासंग्रहावर एक दिवशीय चर्चासत्र रविवार, दि. १० नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता नरहर कुरूंदकर सभागृह, पीपल्स कॉलेज, नांदेड येथे आयोजित केले आहे.

या चर्चासत्रात डॉ.जी.के.ऐनापुरे (सांगली), डॉ. वासुदेव मुलाटे (छत्रपती संभाजीनगर), मोहिनी कारंडे (पुणे), डॉ. उमेश बगाडे (छत्रपती संभाजीनगर), श्रीधर चैतन्या (पुणे) आदी ।अभ्यासक सहभागी होणार आहेत.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रामप्रसाद तौर राहणार असून डॉ. आदिनाथ इंगोले आणि डॉ. कमलाकर चव्हाण चर्चक म्हणून असतील. चर्चा सत्रानंतर लगेचच आई क्रियशन निर्मित व डॉ. विलासराज भद्रे दिग्दर्शित 'दिशा' या एकांकीकेचे सादरीकरण होईल. 'दिशा' या मूळ कथेचे नाट्यरूपांतर डॉ. आदिनाथ इंगोले यांनी केले आहे. तरी रसिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## १४ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर पर्यंत ८५+ आणि दिव्यांग मतदाराचे होणार घर बसल्याच मतदान

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**सिंदखेडराजा :** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने आज २४– सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघांमध्ये मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या अध्यक्षतेखाली विविध बैठका पार पडल्या.

विधानसभा मतदारसंघातील सर्व बी एल ओ यांची आज दिनांक ११ नोव्हेंबर २०२४ रोजी एक दिवसाचे प्रशिक्षण सहकार विद्या मंदिर सिंदखेड राजा येथे मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्री.संजय खडसे यांच्या अध्यक्षतेखाली आज पार पडली.



दिव्यांग मतदार व ८५ वर्षावरील मतदार निरीक्षण करून यादी सादर केलेली आहे तसेच वरीलपैकी मतदार जर गैरहजर असेल तर ती वोटर स्लिप जपून ठेवायची आहे . वाटप झालेले मतदान चिट्ठी बाबत प्रमाणपत्र आणि उरलेले स्लिप व साहित्य जमा करण्यात यावे. बीएलओ यांनी मतदार गैरहजर राहिल्यास मतदार यांचे चिठ्ठी वितरण बाबत प्रश्न उपस्थित केला असता याबाबत अहवाल सादर करावा.सर्व बीएलओ यांनी आपले मतदान साहित्य घेऊन मतदारांना वोटर स्लिप वाटप करायचे आहेत, सदर स्लीप या घरपोच करायचे आहेत.

आजच्या दिवसाची दुसरी बैठक मा. खडसे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली दुपारी एक वाजता पार पडली. टपाल व्यवस्थापन टीम च्या माध्यमातून सर्व झोनल अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

दिव्यांग मतदार व ८५ वर्षे वरील मतदार यादीनुसार एकूण ८०६ अर्ज प्राप्त झाले आहेत, दिनांक १४ नोव्हेंबर २०२४, १५ नोव्हेंबर २०२४,१६ नोव्हेंबर २०२४ पर्यंत घरपोच मतदान प्रक्रिया करून घेण्यात येणार आहे त्याकरिता २५ पथके तयार करून नियुक्त करण्यात आले आहेत. सदर पूर्ण प्रक्रिया करता बीएलओ यांनी गावांमध्ये उपस्थित राहायचे आहे.

आजच्या बैठकीला मा.तहसीलदार सिंदखेड राजा श्री. अजित दिवटे , मा. तहसीलदार देऊळगाव राजा वैशाली डोंगरजाळ, मा. गटविकास अधिकारी सिंदखेड राजा श्री. मुकेश महोर,मा. मुख्याधिकारी सिंदखेड राजा श्री.प्रशांत व्हटकर , मा.नायब तहसीलदार श्री. मनोज सातव ,मा. नायब तहसीलदार प्रवीण घोटकर, मा. नायब तहसीलदार सिंदखेडराजा प्रवीणकुमार वराडे, डॉक्टर आसमा मुजावर नायब तहसीलदार मा.प्र.नायब तहसीलदार श्री.नितीन बढे, मा. नायब तहसीलदार देऊळगाव राजा सायली जाधव, टपाल टीमचे सहायक नोडल अधिकारी सय्यद नजीर सय्यद रजाक, दिपक गोरे,मा. विवेक जगताप, प्रसारमाध्यम नोडल अधिकारी अंकुश म्हस्के , संजय सोनुने इत्यादी अधिकारी तसेच सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते...